FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. १, वर्ष Year २०१९, दिनांक Date २/१/१९

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८, कलमे Sections ७, १२
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून २८/१२/१८, वेळ २१.३० वा, तारीख पर्यंत १/१/१९, वेळ १६.१५ वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ३१/१२/२०१८, वेळ Time १३.४५ वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२, तारीख Date ०२/०१/१९, वेळ Time ०६.३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name अंधेरी-कुर्ला सिग्नल, ठिकाणाचे नंबर No. if any अंधेरी-कुर्ला रोड, गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road —
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ब्रिज खाली, गाव Village अंधेरी (पूर्व), पोस्ट Post —, तालुका Taluka —, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station —, तालुका Taluka —, जिल्हा Distt. —, राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. आवेश पटेल (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name श्री. अशोक पटेल
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ९८९२५६८००५
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation मद्य विक्री / वाईन शॉप संचालक
   (g) धर्म Religion ..., जात Caste —, जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता : Address : बोरी हाऊस, गल्ली / सर्वे नं. Ward, २ रा मजला, घर / नाव नंबर House/Name No. रुम नं. १६, फोन /मो. नंबर Phone/M. No. —, पॅन नं. Pan No. —, वोटर्स नं. Card No. —
   रस्त्याचे नाव Road रुस्तम सिधवा मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable Place मुंबई-१, गाव Village —, पोस्ट Post —, पो. स्टे. P. Stn. —
   तालुका Taluka —, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   १) आनंद सिताराम भोईर, वय ४३ वर्षे, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, युनिट-१०
   २) रामबाबु जिसलाल यादव वय ३३ वर्षे, चालक (खाजगी इसम)

इ

Scanned by CamScanner

ISSIONER OF POLICE

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे [illegible]
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता., वेळी व ठिकाणी यातील आलोसे आनंद भोईर यांनी त्यांच्याकडील तपासाधिन असलेला स्था.गु.र.क्र. २२/१८ कलम ६५, ८१, ८३, ९०, १०८ महाराष्ट्र दारूबंदी कायदा या गुन्हयामध्ये फिर्यादि यांचा भाऊ (पाहिजे आरोपी) यांचेवर अटकेची कारवाई न करण्याकरीता फिर्यादि यांचेकडे रु. २५ लाख लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु. २२ लाख इतकी लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून आलोसे आनंद भोईर यांना त्यांचे खाजगी वाहन इनोव्हा MH-48-AT-7227 मधील चालकासह स्विकारताना रंगेहात पकडले. म्हणून गुन्हा. क्र. ७, १२ भ्रप्रका १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
श्री. रविंद्र क्षिरसागर, सपोआ

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन लाप्रावि, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S ..........,
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.
Shaurah Ashok Patel

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name रविंद्र क्षिरसागर
पदनाम Rank सहा. पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड. क्र. लाप्रावि, मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

यातील नमूद फिर्यादि श्री. भावेश अशोक पटेल वय 33 वर्षे व्यवसाय - मद्यविक्री /वाईन शॉप चे संचालक यांचा जबाब स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखित करण्यात आला असुन तो सोबत जोडला आहे. त्यास प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

R.V.Kshirsagar

(रविंद्र क्षिरसागर)
सहा. पोलीस आयुक्त
लाप्रावि. मुंबई.

Bhavesh

Bhavesh Ashok Patel

Scanned by CamScanner

जबाब                                                  दि.०१/०१/२०१९

श्री. भावेश अशोक पटेल वय ३३ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा.ठी. शेरी हाउस, २ रा मजला, रूम नं.१६, रूस्तम सिंधवा मार्ग, फोर्ट, मुंबई. मो.९८९२५६८००५.

———

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर सन १९८७ पासुन राहण्यास आहे. सदर ठिकाणी मी, माझे वडिल श्री.अशोक प्रेमजी पटेल, वय ६२ वर्षे, आई श्रीमती दिवालीबेन पटेल, वय ५७ वर्षे, पत्नी सौ. अनुसुया पटेल, वय ३१ वर्षे तसेच माझा मुलगा कुमार क्रिष्णा व मुलगी कुमारी वंशिका यांच्या समवेत राहण्यास आहे. माझा स्वत:चा मदय विक्रीचा फोर्ट परिसरात व्यवसाय आहे. सदरचा व्यवसाय हा फोर्ट येथे लिबर्टी वाईन शॉप नावाने आहे. सदरचा व्यवसाय हा मी ओजस मार्केटींग मॅनेजमेन्ट प्रा. लिमि. या नावाने चालवितो. सदर कंपनीमध्ये मी तसेच माझी आई श्रीमती दिवालीबेन हे सदर कंपनीमध्ये डायरेक्टर म्हणुन आहे.

दि.२९/१२/२०१८ रोजी मी माझे फोर्ट येथील लिबर्टी वाईन स्टोअर, २८८, इंजिनिअर बिल्डींग, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई येथे होतो. सुमारे १९.३० वा. ते २०.०० वा.च्या सुमारास एक व्यक्ति दुकानात आली व त्याने मला स्वत:ची ओळख आनंद भोईर असे सांगुन ते मुंबई क्राईम ब्रान्च विभागाचे अधिकारी असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला भावेश पटेल कोण आहे? अशी विचारणा केली असता मी त्यांना माझी भावेश पटेल म्हणुन ओळख करुन दिली. त्यानंतर आनंद भोईर यांनी मला हात निर्देश करून शॉपमधून बाहेर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दुकानातून बाहेर येताच त्यांनी मला आमच्या दुकानाच्या समोरच असलेल्या राखाडी रंगाच्या इन्व्होवा गाडीच्या दिशेने घेवुन गेले. सदर ठिकाणी एका इसमास बेडी लावलेली होती व त्यासोबत आणखी दोन इसम त्याच्या जवळ होते. मी श्री. आनंद भोईर यांच्यासोबत त्यांच्या गाडीजवळ गेलो असता श्री.भोईर यांच्यासोबत असलेल्या इसमाने माझेकडील मोबाईल फोन व डाव्या हातातील घडयाळ काढुन घेतले व बेडी लावलेल्या इसमासोबत माझ्या डाव्या हाताला बेडी लावण्यात आली. त्यावेळी त्यांनी मला वॉईन शॉपच्या संदर्भात प्रश्न विचारून मला त्यांच्या गाडीमध्ये बसविले. मी त्यांच्या गाडीमध्ये बसल्यानंतर श्री.आनंद भोईर यांनी मला बेडी लावलेल्या इसमांस ओळखतो का? अशी विचारणा केली असता मला दिवसातुन १०० ते १५० कॉल हे व्यापारी व कस्टमर यांचे इन्कॉयरीचे कॉल येतात त्यामुळे मी त्यांना खात्रीशीर सांगु शकत नसल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला वॉइन शॉपच्या संदर्भात सदर बेडी लावलेल्या इसमाशी आमचे व्यवहार असल्याबाबत सांगितले. त्यावेळी मी त्यांना आमचा कोणताही त्याच्याशी व्यवहार नसल्याचे खात्रीशिर सांगितले. तसेच माझे सोबत बेडी लावुन बसविलेल्या इसमाला देखिल विचारले असता त्याने देखिल मला ओळखत नसल्याचे व त्यांच्याशी कोणताही व्यवहार केला नसल्याचे सांगितले.

Scanned by CamScanner

त्यावेळी त्यांनी माझा भाऊ श्री. निकुंज तसेच माझे वडिल श्री. अशोक पटेल व आई श्रीमती दिवालीबेन पटेल यांच्याबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला माझा भाऊ श्री. निकुंज याचा माझ्या सोबत बेडी लावलेल्या इसमाशी देण्या—घेण्याचे व्यवहार असल्याचे सांगितले. त्यानंतर ते मला माझे राहते ठिकाणी घेवुन गेले. माझा भाऊ निकुंज हा देखिल माझे राहते घराच्या शेजारीच राहण्यास आहे. श्री. आनंद भोईर हे मला घेवुन त्याचे राहते घरी गेले त्यावेळी माझा भाऊ निकुंज हा घरी नसल्याने त्याचे घर बंद होते. त्यानंतर श्री. आनंद भोईर यांनी मला पुन्हा माझे घरी घेवुन गेले. त्यावेळी माझे राहते घरी माझी आई होती. त्यावेळी श्री. आनंद भोईर यांनी माझे आईला माझा भाऊ 'निकुंज' व माझे वडिल यांचेबाबत विचारणा केली. त्यावेळी ते घरी नसल्याबाबत त्यांना सांगितले. त्यानंतर श्री. आनंद भोईर यांनी इंग्रजीमध्ये Anand Bhoir, 9594676777, P.I. Unit 10 CRIME BRANCH असे स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये एका कागदावर लिहुन तो कागद माझी आई दिवालीबेन पटेल यांना दिला.

त्यानंतर बिल्डींगच्या खाली आल्यांनतर त्यांनी मला माझे वडिल श्री. अशोक पटेल यांचे कार्यालिय कुठे आहे? अशी विचारणा करून मला माझे वडिल यांचे कार्यालयात घेवुन जाण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी श्री. आनंद भोईर याच्या गाडीतुन माझे वडिलांचे पारेख हाउस, फोर्ट, मुंबई येथील कार्यालया जवळ गेलो. परंतु सदरचे कार्यालय बंद असल्यामुळे मी श्री. आनंद भोईर यांना माझे वडिलांना संपर्क साधुन बोलावुन घेण्याबाबत सांगितले. त्यावेळी श्री.आनंद भोईर यांनी मला माझे वडिलांचा स्वत:हुन फोन येईल असे मला सांगितले. त्यांनतर कार्यालयापासुन काही अंतरावर गेल्यावर काही मिनिटांतच श्री. आनंद भोईर यांना माझे वडिलांचा फोन आला. त्यावेळी त्यांनी माझे वडिलांना आमची गाडी थांबलेल्या ठिकाणी बोलावुन घेतले. सुमारे २० ते २५ मिनिटांनी माझे वडिल आमची गाडी थांबलेल्या ठिकाणी आले. वडिल आमचे जवळ आल्यानंतर श्री. आनंद भोईर हे माझे वडिलांशी बोलत होते. त्याचवेळी माझ्या हातास लावलेली बेडी एका इसमाने काढली. मी गाडीच्या बाहेर आल्यानंतर श्री. आनंद भोईर यांनी मला माझे वडिलांना समजविण्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी मला "तुम्हारा बहुत बडा रिस्क है, तुम्हारा कमसे कम दस से तेरा करोडकी लग जायेगी" असे सांगितले. त्यांनतर पुन्हा श्री. आनंद भोईर यांनी मला माझे होणा—या नुकसानीबाबत सांगुन त्यांनी त्यावेळी माझेकडे २५ लाख रुपये दयावे लागतील असे सांगितले. श्री. आनंद भोईर यांनी माझेकडे मागणी केलेल्या रकमेबाबत मी माझे वडिलांशी चर्चा केली. त्यानंतर मी श्री.आनंद भोईर यांच्याशी रू. २५ लाख रक्कम खुप जास्त असल्याचे सांगितले असता त्यांनी चर्चेअंती रू. २२ लाख दयावेच लागतील, त्यापेक्षा कमी होणार नाही असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना त्याच दिवशी मला हॉगकॉग येथे जायचे असल्याने माझे वडिल यांनी श्री.भोईर यांना मला सोडण्याबाबत सांगितले असता त्यांनी वडिलांना जाण्यास सांगुन थोडयावेळाने सोडतो असे सांगितले. त्यानंतर रात्रीचे १०.३५ वा. चे सुमारास श्री. भोईर यांनी मला सोडुन माझा मोबाईल फोन व घडयाळ मला परत दिले व त्यांचा मोबाईल नंबर देवुन मला व्हॉटसअॅपवर हाय म्हणुन पाठविण्यास सांगितले. तसेच त्यांनी मला यापुढे व्हॉटसअॅपवरच कॉल करण्याबाबत सांगितले. त्यानंतर मी त्यांचा मोबाईल नंबर

Scanned by CamScanner

९५९४६७६७७७ हा माझे मोबाईलमध्ये जतन करून त्यांना व्हॉटसअपवर हाय म्हणुन पाठविले. त्यानंतर मी तेथुन निघुन गेलो.

दि. ३०/१२/२०१८ रोजी मी हॉगकॉग येथुन परत आल्यांनतर श्री. आनंद भोईर यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या मागणी संदर्भात माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. ३१/१२/२०१८ रोजी येवुन लेखी तक्रार केली व माझा तक्रार अर्ज सहाय्यक पोलीस आयुक्त क्षिरसागर यांना दिला. दि.३१/१२/२०१८ रोजी दिलेल्या लेखी तक्रारी संदर्भात दोन पंचासमक्ष पडताळणी पंचनामा दरम्यान सपोआ.क्षिरसागर यांनी मला दोन पंचासमक्ष डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मेमरी कार्डसह चालु केले. त्यावेळेस श्री. आनंद भोईर यांनी त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ८०८०५३४५२२ वरून मला व्हॉटसअॅप कॉल केला, त्यावेळी त्यांनी मला “किधर है?” असे विचारले असता मी त्यांना घरी आलो असल्याचे सांगितले. त्यांनतर त्यांनी मला त्यांच्या अंधेरी येथील कार्यालयाजवळ येवुन कॉल करण्यास सांगितले असता मी त्याना त्यांच्या कार्यालयाजवळ येतो असे सांगितले. त्यांनतर पुन्हा श्री.आनंद भोईर यांचा मला फोन आला व त्यांनी मला मी कुठे आहे? याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना त्यांच्या कार्यालयाजवळील चायनिज रेस्टॉरंन्ट येथे आलो असल्याचे सांगितले. सदरवेळी माझे बरोबर काही अंतरावर पंच श्री.सुर्यवंशी हे कोणासही संशय येणार नाही असे थांबले होते. श्री. भोईर यांनी मला मोबाईल व्हॉटसअप कॉलद्वारे संपर्क साधुन त्यांच्या कार्यालयात येण्यास सांगितले. परंतु मी त्यांच्या कार्यालयात न येता बाहेरच त्यांना बोलावुन घेतले. तेव्हा त्यांनी मला सुमेर प्लाझा येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सुमेर प्लाझा येथे येत असता माझ्या अगोदरच श्री. आनंद भोईर हे सुमेर प्लाझाच्या बाहेर उभे असल्याचे दिसले. तेव्हा मी ते उभे असलेल्या ठिकाणी त्यांच्या जवळ गेलो. त्यावेळी श्री. आंनद भोईर यांनी मला “लाया क्या” असे विचारले असता मी त्यांना आता पैसे आणलेले नाहीत असे सांगितले व पैसे जुहु येथील कपडयाच्या दुकानात देतो असे सांगितले. त्यांनतर त्यांनी माझ्याशी पैशाच्या संदर्भात चर्चा करून मला दुसऱ्या दिवशी पैसे स्वतःहुन घेवुन त्यांच्या कार्यालयाजवळ येण्यास सांगितले. श्री. आनंद भोईर यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याचे मला बनियनच्या आत लावलेल्या डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झाल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाल्याने सपोआ. क्षिरसागर यांनी दि. ०१/०१/२०१९ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे श्री. आनंद भोईर यांनी यापुर्वी मागणी केलेल्या लाचेची रक्कम काढण्यासाठी मी वडिलाना दि. ३१/१२/२०१८ रोजी सांगून त्यांना ऑथोरायजेशन लेटर देवून एचडीएफसी बॅक, चर्चगेट ब्रॅच येथे असलेल्या ओजस मार्केटिंग मॅनेजमेंट प्रा. लि. या चालू खात्यातून रु. २२ लाख काढून आण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे वडिलांनी सदरचे पैसे काढून आणले होते. त्यामध्ये सर्व चलनी नोटा या रुपये ५००/— दराच्या होत्या.

समक्ष
R.V.K...

Scanned by CamScanner

दि.०१/०१/२०१९ रोजी सापळा कारवाई दरम्यान सपोआ. क्षिरसागर, सपोआ. अहिरे, सपोआ. चिंचकर व सापळा पथक हे दोन शासकिय वाहनासह माझे राहते घराचे ठिकाणी सुमारे १२.५० वाजताचे दरम्यान आले. त्यावेळी सपोआ. क्षिरसागर यांनी मला त्यांच्या मोबाईल फोनवरून संपर्क साधुन घराच्या खाली बोलाविले. त्याप्रमाणे मी खाली येवुन सपोआ. क्षिरसागर यांना भेटलो असता त्यांनी त्यांचे सोबत असलेल्या इतर अधिका—यांची व दोन पंचांची ओळख करुन दिली व त्यानंतर तेथुनच श्री. भोईर यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. परंतु त्यांनी कॉल घेतला नाही. त्यांनतर १३.०७ वाजता श्री. भोईर यांनी माझे मोबाईलवर संपर्क करून फक्त मी त्यांना नमस्कार केला. त्या व्यतिरिक्त काही बोलणे झाले नाही. त्यांनतर १३.१४ वाजता मी श्री. भोईर यांना त्यांच्या मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी मला त्यांच्या कार्यालयाजवळ दुपारी तीन वाजता येण्यास सांगितले. त्यामूळे वेळे अभावी स.पो.आ.क्षिरसागर यांनी मी त्यांचेकडे दिलेल्या लाचेच्या रक्कमेचे बंडल बॅग मधून काढून त्यांनी प्रत्येक बंडलच्या पहिल्या व शेवटच्या नोटांचे क्रमांक पंचासमक्ष पो.ह. सावंत यांच्यामार्फतीने को—या पेपरवर लिहून घेतले व लागलीच नोटांच्या प्रत्येक बंडलला अॅन्थ्रॉसिन पावडर लावून ती सर्व रक्कम एका काळया व हिरव्या रंगाच्या लॅपटॉप बॅग मध्ये ठेवून बॅगेस देखिल बाहेरूनही अॅन्थ्रॉसिन पावडर लावण्यात आली. तसेच अॅन्थ्रॉसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले व सापळा कारवाईच्या संदर्भात योग्य त्या सूचना दिल्या.

त्यानंतर लागलीच आम्ही पोलीस पथक, पंच असे मारूती एर्टीगा क्र एमएच—०१—बीवाय—४१९६ व पोलीस वाहनाने लोकसेवक यांनी मागणी केलेले रू. २२ लाख ही रक्कम घेवून गुन्हा शाखा, युनिट— १० च्या दिशेने रवाना झालो.

दरम्यान धारावी टी जंक्शन, बांद्रा रोड येथे रस्त्यालगत वाहने थांबविण्यात आली. सदर ठिकाणी माझे व पंचांचे वक्तव्य घेण्यात आले. त्यावेळी १४.३४ वा. होते. दरम्यानच्या कालावधी मध्ये १४.३१ वा. सुमारास लोकसेवक भोईर यांचा माझ्या मोबाईलवर व्हॉटसअप कॉल आला होता. पंचांचे व माझे निवेदन पूर्ण झाल्यानंतर १४.३६ वा. मी लोकसेवक यांच्या मोबाईलवर व्हॉटसअप कॉल केला. त्यावेळी लोकसेवक यांनी मला तीन वाजेपर्यत अंधेरी रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस येण्यास सांगितले. सदरचे संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यावेळी तात्काळ स.पो.आ. क्षिरसागर यांनी पंचाना लोकसेवक हे आज रोजी रुपये २२,००,०००/— लाचेची रक्कम माझेकडून अंधेरी रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस लाचेची रक्कम स्विकारण्यासाठी येणार असल्याने अंधेरी रेल्वे स्टेशन जवळ सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार आहे असे सांगुन सापळा कारवाईच्या अनुषंगाने

R. V. Kshirsagar

Scanned by CamScanner

करण्यात येणाऱ्या सापळापुर्व कार्यवाहीचा उद्देश समजावून सांगुन सापळापुर्व कारवाईस सुरुवात केली व आमची गाडी अंधेरी पोलीस ठाणेच्या दिशेने निघाली.

त्यांनतर १५.०८ वाजता मला सपोआ. क्षिरसागर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पोलीस शिपाई मठपती यांच्या मार्फतीने माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावण्यात आला व वाजता आमची गाडी अंधेरी पोलीस ठाणे जवळ पोहचल्यानंतर मी श्री. भोईर यांना व्हॉटसअप कॉल केला. परंतु त्यांनी तो उचलला नाही. त्यानंतर लागलीच श्री. भोईर यांनी माझे वरील नमुद मोबाईलवर व्हॉटसअप कॉल केला व त्यांनी मला अंधेरी पोलीस स्टेशनच्या मागच्या गेटजवळ रत्नागिरी हॉटेल समोर बोलाविले. त्याप्रमाणे मी गेटच्या समोर असलेल्या रत्नागिरी हॉटेल येथे माझे मो/कार मध्ये थांबलो असता थोडयावेळाने लोकसेवक भोईर यांनी लांबूनच त्यांनी मला हाताच्या इशा—याने त्यांचेजवळ बोलाविले. तेव्हा मी कारमधून उतरुन माझ्याजवळ असलेल्या लाचेच्या रकमेच्या बॅगसह लोकसेवक यांचेकडे गेलो असता त्यांनी मला अंधेरी पोलीस ठाणेच्या गेट मधून आतमध्ये नेले व पोलीस ठाण्याच्या कंपाउंडमध्ये थांबण्यास सांगून ते थोडयावेळात परत येतो असे सांगून ते निघुन गेले. त्यानंतर सुमारे २० ते २५ मिनीटांनी लोकसेवक भोईर हे माझ्याजवळ येवून त्यांनी मला हात निर्देशित करुन गेटच्या बाहेर बोलावून त्यांचेसोबत चालण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व माझेसोबत पाठोपाठ असणारे सपोआ. क्षिरसागर व पंच असे सोबतच फुटपाथवरुन चालत थोडया अंतरावर गेलो असता लोकसेवक भोईर यांनी मला डायव्हर क्यु पिछे आ रहा है, असे म्हटल्याने मी सपोआ. क्षिरसागर यांना गाडीजवळ थांबण्यास सांगितले. त्यावेळी सपोआ. क्षिरसागर व पंच रस्त्याच्या कडेने बाजूला चालू लागले. त्यानंतर लोकसेवक भोईर यांनी मला एका राखाडी रंगाच्या इनोव्हा कारजवळ घेवून गेले. त्या कारमध्ये चालक बसलेला होता. लोकसेवक भोईर हे कारमध्ये बसत असताना त्यांनी मला हाताच्या इशा—याने डायव्हर साईडच्या बाजूने बसण्यास सांगितले. त्यप्रमाणे मी कारमध्ये बसलो. त्यावेळी लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम हाताने निर्देशित करुन मागितली. त्यावेळी मी लाचेची रक्कम असलेली माझ्या हातातील काळया व हिरव्या रंगाची लॅपटॉप बॅग त्यांना दिली. त्यावेळी लोकसेवक भोईर यांनी माझया हातातील बॅग त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारुन त्यांच्या उजव्या मांडीवर ठेवली व लोकसेवक भोईर यांनी चालकास हाताने खुणवून गाडी पुढे नेण्यास सांगितली. त्यावेळी मी ठरल्याप्रमाणे इशारा करुन डोक्यावरुन उजवा हात फिरविला. सदर गाडी ही कुर्ला—अंधेरी जंक्शनला थांबली असता सापळा पथकातील अधिकारी धावत येवून लोकसेवक भोईर यांच्या इन्वोव्हा कारला घेरावा घातला. त्यावेळी भोईर यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु सापळा पथकातील अधिकारी यांनी त्यांना गाडीचे दरवाज्यातच रोखून ठेवले व त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले.

समक्ष
R. V. [signature]

[signature]

Scanned by CamScanner

तरी आज दि. ०१/०१/२०१९ रोजी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद भोईर यांनी माझा भाऊ 'निकुंज' यांच्याविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात कारवाई न करण्यासाठी तसेच मला देखिल सदर गुन्हयात अटक न करण्यासाठी माझेकडे रू. २५ लाखाची लाचेची मागणी करून तडजोडी अंती रू. २२ लाख स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ती घेवुन त्यांच्या खाजगी कारमधून जात असताना अंधेरी कुर्ला सिग्नलला, ब्रीज खाली, अंधेरी पुर्व, मुंबई येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना व त्यांचा चालक खाजगी इसम यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले असुन माझी पोलीस निरीक्षक आंनद भोईर व त्यांचा चालक खाजगी इसम नामे रामबाबु जितलाल यादव यांच्याविरूध्द कायदेशिर कारवाई होणेसाठी फिर्याद आहे.

समक्ष

R.V.Kshirsagar

**(रविंद्र क्षिरसागर)**
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Bhavesh

Bhavesh Ashok Patel

Scanned by CamScanner